
खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com





वर्ष : ०५ | अंक : २४३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.१५ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## जिंतूर-परभणी रोडवर भीषण अपघात

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१४, जिंतूर :** जिंतूर-परभणी रोडवरील विजया जिनिंग परिसरात मंगळवारी (दि.१४) सायंकाळी सुमारे ५:३० वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात घडला.



MH22AG1923 क्रमांकाची मोटारसायकल आणि MH28BB1507 क्रमांकाची बोलेरो पिकअप यांच्यात समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात मोटारसायकलस्वार गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. जखमींना तातडीने उपचारासाठी परभणी येथे हलविण्यात आले आहे.अपघाताचे नेमके कारण अद्याप समजू शकले नसून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## शिक्षण विभागाच्या उदासीनतेविरुद्ध शिक्षकांचे राज्यव्यापी रणशिंग...

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१४, शहापूर (ठाणे) :** शिक्षण विभागाच्या असंवेदनशील आणि आडमुठ्या कारभाराला कंटाळून 'महाराष्ट्र राज्य शिक्षक सेने'ने आता थेट संघर्षाची भूमिका घेतली आहे. येत्या १६ एप्रिल २०२६ रोजी संपूर्ण राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे अध्यक्ष आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी दिला आहे. शिक्षण विभागाच्या प्रलंबित समस्या आणि प्रशासनाच्या अक्षम्य विलंबाविरोधात शिक्षकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल यांना यासंदर्भात निवेदन धाडले असून, प्रशासनाच्या चुकीच्या धोरणांमुळे राज्यातील हजारो शिक्षक आर्थिक आणि मानसिक दडपणाखाली असल्याचे म्हटले आहे. वारंवार विनंती करूनही प्रश्न सुटत नसल्याने अखेर रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**आंदोलनाचे प्रमुख मुद्दे आणि शिक्षकांच्या मागण्या :**

अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन व वेतन: तर्कहीन निकषांमुळे शिक्षकांना अतिरिक्त ठरवून त्यांचे वेतन थांबवणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. शिक्षकांचे वेतन तातडीने सुरू करण्याची मागणीही यात समाविष्ट आहे.

गेल्या २ ते ६ वर्षांपासून शिक्षकांची हक्काची देयके थकली आहेत. निधी उपलब्ध असूनही अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे कोट्यवधींचा निधी व्यपगत (Lapse) झाला आहे. १५ एप्रिलपासून ही प्रक्रिया पुन्हा सुरू करून थकित देयके त्वरित अदा करण्याची मागणी शिक्षक सेनेने केली आहे.

बी.एल.ओ. कामातून मुक्ती: सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन करून शिक्षकांना सक्तीने निवडणुकीच्या कामात (BLO) जुंपले जात आहे. हे अशैक्षणिक काम तातडीने थांबवून शिक्षकांना अध्यापनाच्या कामावर लक्ष केंद्रित करू देण्याची मागणी पत्रात केली आहे. एप्रिल महिना अर्धा संपला तरी मार्चचे वेतन अद्याप मिळालेले नाही. यामुळे शिक्षकांचे कर्जाचे हप्ते थकले असून त्यांना नाहक दंड सोसावा लागत आहे. '१ तारखेला पगार' ही परंपरा कायम राखण्याची आठवण संघटनेने करून दिली आहे.

१० वी, ११ वी आणि १२ वीच्या परीक्षा आणि निकालाच्या धामधुमीत 'पटपडताळणी'चा घाट घातला जात आहे, जो शिक्षकांना नाहक त्रास देणारा आहे. हा कार्यक्रम सप्टेंबर ते डिसेंबर दरम्यान घेण्याची मागणी केली आहे, जेणेकरून शिक्षकांना शैक्षणिक कामात अडथळा येणार नाही.

> प्रशासनाच्या चुकीच्या कारभारामुळे शिक्षकांचा आक्रोश शिगेला पोहोचला आहे. जर हे प्रश्न तातडीने सुटले नाहीत, तर १६ एप्रिलचे आंदोलन हे केवळ सुरुवात असेल. शिक्षकांच्या हक्कासाठी आम्ही संपूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरणार आहोत. या आंदोलनामुळे शिक्षण विभागावर दबाव वाढणार असून, शिक्षकांच्या मागण्या मान्य न झाल्यास भविष्यात अधिक तीव्र आंदोलनाची शक्यता वर्तवली जात आहे.?
>
> **– आमदार ज. मो.अभ्यंकर**

## पिंपळगाव (कुं.) शिवारातील जुगार अड्ड्यावर कुंडलवाडी पोलीसांची धाड

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१४, कुंडलवाडी :** कुंडलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या पिंपळगाव(कुं) शिवारातील तळ्याच्या मागे पाणंद रस्त्या लगत झुडपात लपुन-छपुन सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर कुंडलवाडी पोलिसांनी दि.१२ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास धाड टाकत २४ हजार ४०० नगदी रुपये व २ लाख १० हजार रुपयांच्या जुगाराच्या साहित्य असा एकुण २ लाख ३४ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.याप्रकरणी ८ आरोपीविरुद्ध कुंडलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.त्यापैकी ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. कुंडलवाडी पोलीसांना पिंपळगाव(कुं) शिवारातील तळ्याच्या मागे पाणंद रस्त्या लगत झुडपात लपुन-छपुन जुगार अड्डा सुरू असल्याचे गुप्त माहिती मिळाल्यावरून सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे,पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र मांजरमकर, पोहेकाँ अर्जुन खनपटे,शिवराज गंगुलवार,होमगार्ड जाधव यांनी पिंपळगाव(कुं) शिवारातील तळ्याच्या मागे पाणंद रस्त्या लगत झुडपात लपुन-छपुन सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर दि.१२ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता धाड मारली.यावेळी तिर्रट नावाचा जुगार पत्ते पैसे लावुन खेळत व खेळवित असतांना बाबाराव निमशेट्टे (रा चिरली), हाणमंत घोगरे (रा.चिरली),सचिन खंडगावे( रा. चिरली),रामदास बोगरे (रा. चिरली)यांना पकडले तर आशोक राठोड( रा. पिंपळगाव) बालाजी कदम (रा. चिरली),संदिप सोलगिरे (रा. हुनगुंदा) श्रीकांत लिंबशेट्टे (रा हुनगुंदा) हे ४ जण अंधाराचा फायदा घेत पसार झाले.या धाडीत नगदी २४ हजार ४०० रुपये व २ लाख १० हजार रुपयांच्या ४ मोटारसायकल व जुगाराचे साहित्य असा २ लाख ३४ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी ८ आरोपीविरुद्ध ,कलम १२ (अ), महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महाराष्ट्र तापला! पुढील चार दिवस धोक्याचे !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, मुंबई :** महाराष्ट्रावर असलेली प्रत्यावर्ती चक्रीय वातस्थिती आणि पूर्वेकडून येणारे वारे यांमुळे कोकणामध्ये उष्ण आणि दमट वातावरणस्थिती निर्माण झाली आहे. बुधवार, गुरुवारी कोकणात ही स्थिती कायम राहू शकते; तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. राज्यात मंगळवारीही तुरळक ठिकाणी उष्णतेच्या लाटेप्रमाणे स्थिती नागरिकांना जाणवली. विदर्भात बहुतांश केंद्रांवर मंगळवारी कमाल तापमान ४० अंशांच्या पुढे नोंदले गेले.



गेल्या आठवड्यात प्रादेशिक हवामान विभागाने १५ एप्रिलच्या आसपास पुन्हा एकदा वाऱ्यांची दिशा बदलल्याने तसेच प्रत्यावर्ती चक्रीय वातस्थितीमुळे कोकणात उष्ण आणि दमट वातावरण निर्माण होऊ शकते, असा इशारा दिला होता. याचा अनुभव मुंबई, नवी मुंबई येथे आला. तर महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाड्यात तसेच मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी कमाल तापमान ४० अंशांच्या पुढे पोहोचले होते. मुंबईत सांताक्रूझ येथे मंगळवारी ३६ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदले गेले. हे तापमान सरासरीपेक्षा २.६ अंशांनी अधिक होते, तर कुलाबा येथे ३४.६ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. हे तापमान कुलाब्याच्या सरासरी तापमानापेक्षा १.८ अंशांनी अधिक होते. मंगळवारी किमान तापमानही दोन्ही केंद्रांवर चढे होते. सकाळच्या वेळी आर्द्रता अधिक असल्याने अस्वस्थताही मुंबईकरांनी अनुभवली. सांताक्रूझ येथे २४.९; तर कुलाबा येथे २५.५ अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदले गेले. मुंबईत तुरळक ठिकाणी पारा ३६ अंशांच्याही पुढे नोंदला गेला.

जळगाव, सांगली, सातारा, सोलापूर या केंद्रांवर कमाल तापमान ४० अंशांहून अधिक होते. सोलापूर येथे ४३.२; तर पुण्यात ३९.९ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदले गेले. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर येथे सरासरीहून तीन अंशांनी कमाल तापमान अधिक होते. छत्रपती संभाजीनगर येथे ४१.४; तर परभणी येथे ४२.१ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली.

**मुंबई, ठाणे, कोकणातही त्रास**

बुधवारी आणि गुरुवारी मुंबईसह पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट वातावरणाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात सांगली आणि सोलापूर येथे बुधवारी आणि गुरुवारी उष्णतेची लाट निर्माण होऊ शकते. बुधवारी छत्रपती संभाजीनगर येथे; तर जालना, परभणी, हिंगोली येथे बुधवारी आणि गुरुवारी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. अकोला, अमरावती येथे गुरुवार ते शनिवार, बुलडाणा, यवतमाळ येथे शुक्रवार आणि शनिवार; तर वर्धा येथे शनिवारी उष्णतेच्या लाटेचा अंदाज आहे.

**अकोल्यात पारा ४४ अंशांवर**

राज्यात सर्वाधिक कमाल तापमान अकोला येथे ४४ अंश सेल्सिअस नोंदले गेले. अमरावती येथे ४३.८, बुलडाणा येथे ४१.६, चंद्रपूर येथे ४२.२, गोंदिया येथे ४१.१, नागपूर येथे ४२.२, वाशिम येथे ४२.४, वर्धा येथे ४३.५; तर यवतमाळ येथे ४२.६ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची मंगळवारी नोंद झाली.

## राहुरी पोटनिवडणुकीच्या रणधुमाळीत पाण्याचा प्रश्न तीव्र; लाईटचा लपंडाव, नागरिक त्रस्त

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१४, राहुरी :** राहुरी विधानसभा मतदारसंघात सध्या पोटनिवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना राहुरी खुर्द परिसरातील नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे गंभीर दुर्लक्ष होत असल्याचे चित्र समोर येत आहे. एकीकडे राजकीय सभा, प्रचार आणि आश्वासनांचा पाऊस सुरू असताना दुसरीकडे पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची वनवण सुरू असल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



उन्हाळ्याच्या कडक झळा वाढत असताना पाण्याची गरज अधिक भासते. मात्र, गावात विहीर व बोअरवेल यांसारख्या पाणी स्रोतांचा अभाव असल्यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. परिणामी नागरिकांना पाण्यासाठी लांब अंतर पार करावे लागत असून, दिवसाचा मोठा वेळ केवळ पाणी मिळवण्यात खर्च होत आहे.

अनेक वेळा महिन्यातून आठ-आठ दिवस पाणीपुरवठा होत नसल्याने घरगुती कामे ठप्प होण्याची वेळ आली आहे. पाण्यासाठी पहाटेपासून महिलांची धावपळ सुरू होते. डोक्यावर हंडे घेऊन उन्हातान्हात फिरावे लागत असल्याने त्यांचे हाल होत आहेत.

यातच रात्रीच्या वेळी वीजेचा लपंडाव सुरू असल्याने परिस्थिती आणखी बिकट होते. लाईट नसल्यामुळे उपलब्ध पाणीही साठवता येत नाही, त्यामुळे नागरिकांचा त्रास अधिक वाढत आहे.

निवडणुकीच्या प्रचारात मोठमोठ्या आश्वासनांचा वर्षाव होत असताना प्रत्यक्षात पाणी व वीज यांसारख्या मूलभूत सुविधांकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. मतांसाठी सर्वजण येतात, पण पाण्याच्या प्रश्नाकडे कोणीच लक्ष देत नाही, अशी तीव्र प्रतिक्रिया स्थानिकांनी व्यक्त केली.

या गंभीर परिस्थितीत ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, तसेच वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी संबंधित विभागाशी समन्वय साधावा, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

एकीकडे राहुरी पोटनिवडणुकीचा गडगडाट आणि दुसरीकडे पाण्यासाठीची वनवण अशा दुहेरी संकटात राहुरी खुर्द परिसरातील नागरिक सापडले असून, विशेषतः महिलांची व्यथा अधिकच तीव्र होत चालली आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान देशाच्या लोकशाहीचा आधारस्तंभ : आ. जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संपूर्ण भारताचे दिशादर्शक होते. त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या आणि कठोर परिश्रमांच्या बळावर समाजातील अन्याय, विषमता आणि अज्ञानाविरुद्ध लढा दिला. त्यांनी दिलेले संविधान आपल्या देशाच्या लोकशाहीचा आधारस्तंभ असल्याचे प्रतिपादन आ. किशोर जोरगेवार यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी महानगर कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. तसेच गांधी चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला माल्यार्पण करून आ. किशोर जोरगेवार यांनी अभिवादन केले. यावेळी राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांची उपस्थिती होती. तसेच यावेळी भारतीय जनता पक्षाचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष रघुवीर अहिर, महामंत्री रविंद्र गुरुनुले, मनोज पाल, श्याम कनकम, सविता दंढारे, गटनेते शेखर शेट्टी, बलराम डोडाणी, विधानसभा अध्यक्ष दशरथसिंह ठाकूर, वंदना हातगावकर, बहुजन महिला आघाडी अध्यक्षा विमल कातकर, अरुण तिखे, तुषार



सोम, निलेश बेलखेडे, नगरसेविका सविता कांबळे, ॲड. सारिका संदुरकर, आशा देशमुख, शीतल गुरुनुले, पुष्पा उराडे, सरला कुळसंगे, नगरसेवक भालचंद्र दाणव, जितेश कुळमेथे, रॉबिन बिश्वास, नितेश गवळी, आशिष मासिरकर, स्वप्निल डुकरे, सायली येरणे, राकेश नाकाडे, राशिद हुसेन, नकुल वासमवार, वंदना तिखे, चंद्रशेखर देशमुख, प्रमोद शास्त्रकार, सुधीर कारंगल, ॲड. परमहंस यादव, राकेश बोमनवार, रीना साखरकर, लक्ष्मी पांडे, छाया चावरे, आमेश आयलू आदींची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. किशोर जोरगेवार म्हणाले की, नागपूरनंतर चंद्रपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दीक्षा दिली. या पवित्र दीक्षाभूमीचा सर्वांगीण विकास करण्याचा संकल्प आपण केला आहे. यासाठी ५७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. काही तांत्रिक अडचणी दूर करून या विकासकामाला लवकरच सुरुवात होणार आहे. आपण शहरातील बुद्ध विहारांमध्ये निधी उपलब्ध करून दिला असून, या निधीतून १३ बुद्ध विहारांमध्ये अभ्यासिका तयार होणार असल्याचे ते यावेळी म्हणाले.

बाबासाहेबांनी नेहमीच शिक्षणाला सर्वोच्च महत्त्व दिले. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा त्यांचा संदेश आजही प्रत्येकासाठी मार्गदर्शक आहे. शिक्षणाच्या माध्यमातूनच समाजात परिवर्तन घडवून आणता येते, ही त्यांची शिकवण आपण सर्वांनी आत्मसात करणे गरजेचे आहे. आजच्या काळात बाबासाहेबांच्या विचारांची अधिक गरज आहे. सामाजिक समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा प्रसार करणे ही आपली जबाबदारी आहे. बाबासाहेबांचे जीवन हे संघर्ष आणि यश यांचे उत्तम उदाहरण आहे. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेऊन जगाला आपल्या कर्तृत्वाची जाणीव करून दिली.

त्यांच्या आदर्शातून प्रेरणा घेऊन आपणही आपल्या आयुष्यात मोठी उद्दिष्टे साध्य करावी. बाबासाहेबांच्या विचारांना कृतीत उतरवणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाला भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




## शेतकऱ्यांचे कैवारी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवी हक्कांसाठी केलेल्या कार्यात राजसत्तेकडून आणि धर्मसत्तेकडून सहजपणे दुर्लक्षिल्या जाणाऱ्या घटकांकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. देश म्हणजे देशाच्या फक्त सीमा नाहीत, देशाच्या अखत्यारीत येणारी फक्त जमीन नाही; तर त्या देशात राहणारी जितीजागती माणसे असतात, हे सूत्र घेऊन केलेली अनेक कामे आहेत. विशेषतः जातीव्यवस्थेतून नाडला जाणारा-वर्षानुवर्षे शोषितपण स्वीकारून भयगंडात जगणारा शूद्र-अतिशूद्र समाज, पितृसत्तेतून आलेले शोषितपण स्वीकारून वर्षानुवर्षे स्वतःला दुय्यम मानत चार भिंतीतले आयुष्य जगणारी स्त्री, सरंजामशाहीतून निर्माण झालेली जमीनदारांची दादागिरी स्वीकारून विनातक्रार दारिद्र्यात राहणारे शेतकरी, भांडवलदारांच्या पिळवणुकीला तोंड देत सदा आर्थिक गुलामीत जगणारे कामगार यांच्यासाठी काही करावे म्हणून, बाबासाहेबांनी स्वतःची बुद्धिमत्ता आणि राजकारणातील सक्रियता कामी आणली.

शेतीशी ज्यांचा संबंध येतो अशांचे तीन प्रकारे वर्गीकरण लक्षात घ्यावे लागते. यातील पहिला घटक म्हणजे हजारो एकर जमिनीचे मालक असलेले जमीनदार. दुसरा घटक म्हणजे त्यांच्या जमिनीमध्ये मजूर म्हणून राबणारे कष्टकरी, जे बहुतांश खालच्या समजल्या जाणाऱ्या जातीतले असतात. तिसरा घटक म्हणजे ज्यांच्याकडे दोन हेक्टरपेक्षाही कमी जमीन आहे असा अल्पभूधारक. वरीलपैकी दुसऱ्या आणि तिसऱ्या घटकांच्या हिताचा सहसा कुणी विचार करत नाही. ब्रिटिश काळातही शेतमजूर आणि शेतकरी यांच्या प्रश्नाकडे फारसे लक्ष दिले जात नसल्याचे बाबासाहेबांच्या लक्षात आले होते. त्यांनी स्वतः शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा विचार केला आणि १९१८ साली एक पुस्तक लिहिलं 'स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया अँड देअर रेमिडीज'. या छोट्याशा पुस्तकातून बाबासाहेबांचे भारतातील शेतीविषयक प्रश्न आणि उपाययोजना यावरील चिंतन दृष्टीस पडते. यातील बाबासाहेबांचे निरीक्षण म्हणते, 'भारतातील शेती आजारी आहे. ती उत्पादनखर्च अधिक आणि नफा कमी या विळख्यात सापडलेली आहे. छोट्या शेतकऱ्याकडे पुरेशी पाणीव्यवस्था नाही. बँकांकडून कर्ज उपलब्ध नाही. आर्थिक टंचाईमुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करता येत नाही आणि या सर्वांवर मात करून जर शेतकऱ्याने कष्टाने शेती पिकवलीच तर त्या शेतमालाला सरकारकडून चांगला हमीभाव नाही. यामुळे शेतकरी कायम दारिद्र्याशी मुकाबला करतो.'

यावर उपाययोजना सुचवताना बाबासाहेबांनी १९१८ साली सांगून ठेवले आहे की, जमिनीचे एकत्रीकरण करून सामूहिक शेतीचा पर्याय स्वीकारायला हवा. यामुळे 'उत्पादन खर्च कमी आणि नफा जास्त' अशी स्थिती येऊ शकते. सुधारित बियाणे, पिकाची विविधता, नवीन तंत्रज्ञानाचा वापर आणि यासाठी सरकारी मदत या आधारे शेती सुधारू शकते. शेतकऱ्याला बाजारभाव देताना उत्पादन खर्च आणि ५० टक्के नफा त्याला मिळेल असा सरकारने कायदा करावा, असेही बाबासाहेब सांगतात. हे केले नाही तर शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागेल, हाही इशारा देतात. किती दूरदृष्टीचे होते बाबासाहेब!

शेतकऱ्यांनी एकत्र येऊन 'शेतकरी उत्पादक संघटना' निर्माण कराव्यात; जेणेकरून सरकारकडून शेतमालाला योग्य बाजारभाव मिळवून घेता येऊ शकतो, हेही बाबासाहेबांनी सुचवलेले आहे. सरकारने शेतीला उद्योगाचा दर्जा द्यावा, ही सूचना ते करतात. बाबासाहेब नोंदवतात की, शेतीवरील बोजा वाढलेला आहे आणि वाढत्या पिढ्यांबरोबर शेती आणखी कमी तुकड्यांत विभागली जात आहे. यावर उपाययोजना म्हणून शेतकऱ्याने आपल्या सर्वच मुलांना शेतीवर अवलंबून न ठेवता एकालाच शेतीत गुंतवावे आणि बाकीच्या मुलांना सरकारी नोकरी, काही लहान-मोठे उद्योगधंदे यांत गुंतवावे. यामुळे शेतीवरील बोजा कमी होईल आणि शेतीसोबत इतर जोडधंदे निर्माण होतील. संपूर्ण भारतात शेतीसोबतच लघुउद्योगांचे जाळे पसरावे, असे त्यांचे मत होते.

भारतातील शेतकरी निसर्गावर अवलंबून राहतो. त्यामुळे ओला दुष्काळ आणि सुका दुष्काळ याचाही त्याच्यावर परिणाम होतो. वर्षाचे ३६५ दिवस शेतीला नियमित पाणीपुरवठा होईल, अशी व्यवस्था नसल्याने शेतकऱ्यावर दुष्काळाचे संकट येते, हे सत्य बाबासाहेबांनी जाणले होतं. म्हणूनच या संकटातून शेतकऱ्याला कसे काढावे याचा विचार बाबासाहेबांनी केला.

**- डॉ. आशालता कांबळे**

# राज्यातील गुटखाबंदी खरी कि खोटी ?



गेल्या काही दिवसांत राज्याच्या अन्न आणि औषध विभागाने मुंबईतील मालाड, कुर्ला, सांताक्रूझ, भांडुप, धारावी, मुलुंड, नळबाजार या ठिकाणी छापे मारून सुमारे १३ लाख ६९ हजारांचा गुटखा जप्त केला. या कारवाई अंतर्गत १६ जणांना बेड्याही ठोकण्यात आल्या आहेत. भिवंडीलाही अशाच प्रकारची मोठी कार्रवाई करून ६४ लाखांचा गुटखा जप्त करण्यात आला होता. दिंडोरी पोलिसांनी चाचडगावमध्ये अशीच ओठी कारवाई करून ५१ लाखांचा गुटखा हस्तगत केला. गेल्या महिन्याभरात राज्यभरात अशाच प्रकारच्या लहानमोठ्या कारवाया करून पोलिसांनी कोट्यवधींचा गुटखा जप्त केला आहे. भिवंडीत जप्त केलेला ६४ लाखांचा गुटखा पोलिसांनी डम्पिंग ग्राऊंडमध्ये जमिनीत पुरला मात्र गुटखा माफियांनी जमीन खोदून तो लंपासही केला.

एकेकाळी दुर्मिळ म्हटला जाणारा कर्करोग आज भारतात झपाट्याने वाढतो आहे. भारतात कर्करोगाने ग्रस्त रुग्णांपैकी ३० टक्केहून अधिक रुग्ण हे मुखाच्या कर्करोगाने ग्रस्त असतात. देशात जलदगतीने वाढत जाणारा मुखाचा कर्करोग रोखणे वैद्यकशास्त्रासमोरील आज मोठे आव्हान बनले आहे. गुटखा, तंबाखू यांचे नियमित सेवन हे या रोगाचे प्रमुख कारण आहे. देशातील झपाट्याने वाढणाऱ्या रुग्णांची संख्या लक्षात घेऊन देशातील २६ राज्यांनी आणि पाच केंद्रशासित प्रदेशांनी गुटखाबंदी लागू केली आहे. असे असताना गुटखाबंदी करणाऱ्या सर्वच राज्यांत आज गुटखा सहज उपलब्ध होतो आहे. यावरूनच आपल्या देशात भ्रष्टाचार किती खोल रुजला आहे हे लक्षात येईल.

महाराष्ट्रात २०१२ साली गुटखाबंदी लागू करण्यात आली. आजमितीला ही गुटखाबंदी केवळ कागदावरच असल्याचे चित्र दिसत आहे. शहरी भागात पानाच्या लहान मोठ्या टपऱ्यांवर, किराणा मालाच्या छोट्या दुकानांमध्ये आज सर्रासपणे गुटखा विकला जात आहे. शाळा महाविद्यालय परिसरातील टपऱ्यांवरही गुटखा सहज उपलब्ध होत असल्याने शाळकरी मुले आणि महाविद्यालयीन तरुण गुटख्याच्या आहारी जाऊ लागली आहेत. फरक एवढाच असतो कि अशा ठिकाणी गुटख्याची पाकिटे या टपऱ्यांवर दर्शनी भागात मांडली जात नाहीत; मात्र मागणी केल्यावर हवी तितकी पाकिटे उपलब्ध करून दिली जातात. कोरोनाकाळात जिथे जीवनावश्यक वस्तू मिळणे मुश्किल होते अशा भागांत गुटख्याची पाकिटे चढ्या दराने विकली जात होती. अनेक ठिकाणी स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने पान टपऱ्यांवर दर्शनी भागात चिप्सच्या पाकिटांप्रमाणे विविध कंपन्यांची गुटख्याची पाकिटे लटकवलेली दिसून येतात. गावांमध्ये रेल्वेच्या पॅसेंजर गाड्या थांबतात तेव्हा जवळच्या परिसरातील तरुण गुटखा, सिगारेट आणि तंबाखूची पाकिटे विकण्यासाठी गाडीत बिनधास्तपणे फिरतात. प्रवासीसुद्धा यांच्याकडून मोठ्या प्रमाणात खरेदी करतात.

अन्न व औषध प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी आणि भ्रष्ट पोलीस यंत्रणा यांमुळे राज्यभर गुटखा पुरवण्याचे छुपे जाळे निर्माण झाले आहे. दरवर्षी विविध ठिकाणी धाडी टाकुन कोट्यवधीचा गुटखा जप्त केला जातो; मात्र ही कारवाई केवळ दाखवण्यापुरती असते असे अनेक सुजाण नागरिकांचे मत आहे. आजमितीला विविध वाहिन्यांवर, युट्युबवर गुटख्याच्या जाहिराती प्रसारित केल्या जातात ज्यामध्ये उल्लेख पान मसाल्याचा केला जात असला तरी या जाहिराती गुटख्याच्या असतात हे सर्वांनाच ज्ञात आहे. नामवंत कलाकार मंडळी, खेळाडू या जाहिरातींच्या माध्यमातून नागरिकांना गुटखा खाण्याचे आवाहन करताना दिसतात. एकेकाळी गुटखा हा झोपडपट्ट्यांतून, मध्यमवर्गीयांच्या वस्तींमध्ये मोठ्या प्रमाणात विकला जात असे; मात्र अशा जाहिरातीमुळे आज गुटख्यालाही 'रॉयल स्टेटस' प्राप्त झाले आहे. सुशिक्षित आणि श्रीमंतांमध्येही गुटखा खाल्ला जाऊ लागला आहे. एका बाजूने राज्यात गुटखाबंदी करण्यात आली आहे, त्यासाठी शिक्षेचे आणि दंडाचे प्रावधानही करण्यात आले आहे आणि दुसऱ्या बाजूने तरुणांचे रोल मॉडेल असणाऱ्या सिनेकलाकारांना आणि खेळाडूंना घेऊन विविध कंपन्यांच्या गुटख्याची जाहिरातबाजी चालू आहे.

गावागावांतून गुटखा पुरवला जात आहे, टपऱ्यांवर सहज उपलब्ध करून दिला जात आहे. हा विरोधाभास नेमके काय दर्शवतो ? गुटख्याच्या निर्मिती आणि वितरणाबाबत कायदा करण्यात आला आहे; मात्र त्याची अंमलबजावणी करण्याची भिस्त ज्यांच्यावर आहे ती पोलीस यंत्रणाच या कायद्याला धाब्यावर बसवणाऱ्यांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहेत. आज काही पोलिसांसह राजकीय नेतेमंडळीही सार्वजनिक ठिकाणी गुटखा चघळताना दिसतात, त्यामुळे राज्यात खरेच गुटखाबंदी आहे का ? हा प्रश्न कोणालाही पडल्यावाचून राहत नाही.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# जागतिक स्तरावर एकमेकांची जिरवाजिरवी नको

सद्या विविध कारणावरुन जगातील अनेक देशांत युद्धाचे सावट पसरले आहे. प्रत्येक देश आपली कमांड अथवा वर्चस्व वादातून लढाईच्या मैदानात उतरले आहेत. त्याचेच प्रातिनिधिक उदाहरण द्यायचे झाल्यास अमेरिका, इस्त्राईल आणि इराण यांनी सामुद्रधुनी मार्गाचे कारण पुढे करत जागतिक तणाव निर्माण केला आहे.

विविध मागण्या, प्रस्तावाच्या फेऱ्या, बैठका घेवून हि तणाव निवळतांना दिसेना जगातील सर्वचं देशानी कमीअधिक प्रमाणात विविध शोध लावले. युद्धजण्य साहित्याने आपण किती पुढे गेलो. प्रगती साधली याच्या आणाभाका मारतात.

मात्र हे सर्वकाही एकमेकांना शह देण्यासाठी आहे का ? अनेकांची मस्ती जिरण्यासाठी याचा वापर करायचा का ? यासारखे या युद्धामुळे अनेक प्रश्न निर्माण होताहेत सद्या सुरु असलेल्या युद्धात अनेक निरागस लोक मयत झाले वित्तहानीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

याचा कुणालाच फायदा नाही मग याचा विचार का होईना हे देशांतील साम्राज उभे करायला अनेक वर्षे दिवस जातात याचे कुणालाच काही नाही फक्त आणि फक्त वर्चस्ववाद युद्धाने कुणाचेच कल्याण झाले शांततेने मार्ग काढणे कधीही हिताचे आहे हे सर्वश्रुत असताना असला मार्ग कशासाठी ? याचे उत्तर शोधणे गरजेचे आहे.

**- राजू जाधव,**
**मांगूर जि.बेळगांव**

## स्वामी

स्वामी समर्थ रुपा
डोळ्या भरुन पाहू
मुर्तीमंत चमत्कार
रे मुर्ती अजानुबाहू

तुझ्या कृपावर्षावी
स्वर्ग सुखात न्हाहू
समर्थ समर्थ नाव
मुखात भरून घेऊ

जवळी ब्रह्म चैतन्य
मुळीच नको भिऊ
मनातअक्कलकोट
नको गांगरुन जाऊ

सुखदुःख वाट्याला
जेआले सगळे साहू
समर्थ पाठी समर्थ
शरणागत केतू राहू

चरित्र सत्छील हवे
समस्तभगिनी भाऊ
जमेल तितुकी सेवा
स्वामी स्तवना गाऊ

घास भरवू भुकेल्या
रे नंतर आपण जेऊ
समर्थप्रसाद आकंठ
पक्ष्या प्राण्याही देऊ

निरीच्छनिर्लेप सेवा
आईले विश्वास ठेवू
स्वामीनामक ज्योत
अंतरात तेवत ठेवू


**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# सामान्य माणसाची आर्त हाक: दुर्लक्षित क्षमतेचा टाहो

मी, विजयकुमार कट्टी, आज तुमच्याशी केवळ एक नागरिक म्हणून नाही, तर गेल्या अनेक वर्षांपासून पर्यावरणाच्या रणांगणात लढणारा तुमचा 'ठाण्याचा ट्री-मॅन' म्हणून संवाद साधत आहे. गेल्या तीन वर्षांपासून मी माझे सर्वस्ववेळ, पैसा आणि ऊर्जा हवामान बदलाच्या (Climate Change) वाढत्या धोक्याविरुद्ध लढा देण्यासाठी अर्पण केले आहे. माझे प्रकल्प, मग ते पर्यावरणाशी जुळवून घेणारे (Adaptive) असोत वा कार्बन उत्सर्जन कमी करणारे (Mitigation) असोत, हे केवळ तांत्रिक आराखडे नाहीत; ते आपल्या सर्वांच्या सुरक्षित भविष्यासाठी रचलेले पायाभूत दगड आहेत.

परंतु, हे काम करत असताना मला आलेला अनुभव अत्यंत अस्वस्थ करणारा आहे. आपल्या समाजात अनेक कार्यक्रम 'इव्हेंट' म्हणून मोठ्या थाटामाटात साजरे केले जातात, तिथे तासनतास वेळ खर्च केला जातो. पण ज्या विषयावर आज प्रत्यक्ष जमिनीवर उतरून कृती करण्याची गरज आहे, तिथे समाजातील धुरिणांकडे साधी २० मिनिटेही नाहीत? हे सांगताना मला कोणतीही तक्रार करायची नाही, तर माझी मानसिक अवस्था तुमच्यासमोर मांडायची आहे. मी आज एका अशा अनिश्चिततेच्या उंबरठ्यावर उभा आहे, जिथे माझ्याकडे क्षमता आहे, योजना आहेत, पण केवळ व्यवस्थेच्या उदासीनतेमुळे त्या अमलात येण्यासाठी मी एकाकी प्रतीक्षा करत आहे. ही प्रतीक्षा थकवणारी आहे, कारण निसर्ग कोणाचीही वाट पाहत नाही.

शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केला तर आपण विनाशाच्या अशा वळणावर आहोत, जिथे दुर्लक्ष करण्याची किंमत खूप मोठी असेल. ज्या वेगाने आपण पर्यावरणाकडे पाठ फिरवत आहोत, तो दिवस आता फार दूर नाही जेव्हा आपल्या देशाचा शेतकरी धान्य पिकवण्याच्या स्थितीत नसेल. जेव्हा जमिनीचा कस संपलेला असेल आणि हवामान अनिश्चित असेल, तेव्हा तुमच्या ताटात अन्न नसेल. त्यावेळी कदाचित तुम्ही जागे व्हाल, पण तेव्हा खूप उशीर झालेला असेल. तुमची कार्यक्षमता अफाट आहे, मग ही साधी समस्या 'जागतिक संकट' बनण्याची वाट आपण का पाहत आहोत? लक्षात ठेवा, सत्ता आणि संपत्ती अन्नाची जागा कधीच घेऊ शकत नाही.




याच संघर्षाचा एक पुढचा भाग म्हणून, मी एक 'पायलट प्रोजेक्ट' सुरू करत आहेजो 'सिंगल-युज प्लास्टिक' (Single-use Plastic) कमी करण्यावर आधारित आहे. हा प्रकल्प केवळ नियमावलीवर नाही, तर 'काळजी आणि कर्तव्य' या भावनेवर आधारलेला आहे. प्लास्टिकला 'दुसरे जीवन' (Second Life) देऊन त्याचा पुनर्वापर कसा करता येईल, यावर आम्ही काम करत आहोत. वेळ खूप कमी आहे आणि आव्हाने मोठी आहेत. यावर्षी मी 'ग्रीनहाऊस गॅसेस' (GHG) कमी करण्याच्या अनेक संधी घेऊन आलो आहे, जिथे तुमची केवळ उपस्थिती नाही, तर तुमची 'प्रत्यक्ष कृती' मोजली जाईल.

लोकांची उदासीनता पाहून मन अस्वस्थ होते, कारण ज्या कामात तात्काळ वैयक्तिक फायदा दिसत नाही, त्याकडे दुर्लक्ष करण्याची आपली सवय आपल्याला विनाशाकडे ढकलत आहे. रिकाम्या सबबी आणि बघू, करू अशा उत्तरांनी आता काम चालणार नाही. माझा हा लढा मी माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत सुरूच ठेवणार आहे, या आशेने कीमाझा हा देह साथ सोडण्यापूर्वी, या व्यवस्थेला जाग येईल आणि माझ्या या निस्वार्थ कामाला खंबीर पाठबळ मिळेल.

मला तुमची दया नको आहे, मला तुमची निष्ठा हवी आहे. माझा प्रकल्प सज्ज आहे, त्याचे गणित शास्त्रीय आहे आणि उद्देश शुद्ध आहे. आता गरज आहे ती फक्त सत्तेत असलेल्या लोकांनी माणसाचा 'चेहरा' बघणे सोडून त्यामागचे 'मिशन' बघण्याची.

**या मोहिमेबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी आणि आपला सहभाग नोंदवण्यासाठी संपर्क करा:**

७९७७५१३८२२
(७९७७५१३८२२)

**- विजयकुमार कट्टी -**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## जिल्हास्तरीय तायक्कांदो स्पर्धेत मंद्रुपच्या खेळाडूंचे यश
## ३० सुवर्ण,६ रोप्य, ५ कांस्य पदकाची कमाई




**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.१४, सोलापूर :** स्टूडन्ट ऑलिम्पिक असोसिएशनच्या वतीने पिसिजन इंग्लिश मीडियम स्कूल सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्टुडन्ट ऑलिम्पिक असोसिएशन सोलापूर जिल्हास्तरीय तायक्कांदो स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत दक्षिण सोलापूर तायक्कांदो अकॅडमी मंद्रूपच्या खेळाडूंनी विविध वजनी गटात यश संपादन केले आहे.

पौर्णिमा खंदारे, साक्षी खंदारे, महेक शेख, मंजुळा वाले, प्रतीक्षा देठे, आरोही रणखांबे, क्रिशा पवार, शुक्रना नदाफ, प्रतीक्षा देविदास, अन्वी पवार,सफीना शेख, दिव्या पवार, श्रावणी पवार, आरोही भागवत, श्रेया पवार, आरोही खंदारे, स्वप्नाली पवार,अभिषेक वाले, वंश राठोड,संग्राम नवले, प्रेम चव्हाण, अभिजीत खरात, सोहम स्वामी, सोहम चव्हाण, अबूबकर नदाफ, समर्थ चव्हाण, सुमेध पोतदार, अथर्व शिंगडगाव, प्रेम चव्हाण, हर्ष सरवदे

यांनी सुवर्णपदक पटकावले व रविराज कुसुरे, मोहन चव्हाण, स्वाती कट्टीमनी, श्रद्धा सोलापूर, दीक्षा हेळकर, आराध्या राठोड याने रौप्य पदक मिळविले. तर आरोही कंदले, तनुजा सरवदे, सुमेध पोतदार, सार्थक पवार, प्रथमेश आडोळे यांनी कांस्यपदक पटकाविले यश संपादन केलेल्या

खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक शिवराज मुगळे व यश खंदारे यांचे मार्गदर्शन लाभले. विजयी खेळाडूंची २ ते ३ में सोलापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

## श्री शिवाजी विद्यालय, बुलढाणा येथे आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, बुलढाणा :** आज दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी श्री शिवाजी विद्यालय तथा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, बुलढाणा येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष अ‍ॅड.बाबासाहेब भोंडे आजीवन सभासद, शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, प्रमुख उपस्थिती विद्यालयाचे प्राचार्य प्रमोद कावरे, पर्यवेक्षक नितीन ढोमणे, शिक्षक प्रतिनिधी योगेश भोंडे, शिक्षकेतर प्रतिनिधी मांगे बाबूजी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन ढोमणे यांनी केले. त्यानंतर कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले देशमुख सर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य याविषयी माहिती सांगितली. त्यानंतर कु. दिपाली मते यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य, संविधान निर्मितीतील योगदान, जात, धर्म, लिंग याचा भेदभाव न करता सर्व नागरिकांना समान अधिकार यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले योगदान याविषयी माहिती सांगितली. यानंतर विद्यालयाचे प्राचार्य प्रमोद कावरे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यता निवारण, दलित हक्क, महिला सक्षमीकरण आणि कामगार कल्याणासाठी आयुष्यभर लढा कसा दिला, तसेच स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून त्यांनी राज्यघटनेत मोलाची भूमिका कशी बजावली याविषयी माहिती सांगितली.

यानंतर अध्यक्षीय भाषणात अ‍ॅड. बाबासाहेब भोंडे यांनी दलित अस्पृश्य आणि शोषित वर्गाच्या हक्कासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर लढा कसा दिला आणि समाजात मोठे परिवर्तन कसे घडवून आणले याविषयी माहिती सांगितली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरुण साळोक यांनी केले तर आभार प्रदर्शन दीपक मजगे यांनी केले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक, व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## पर्यटन वाढीसाठी पुढाकार माथेरान मुख्य मार्गाचा होणार मेकओवर



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१४, माथेरान :** माथेरानमधील मुख्य महात्मा गांधी मार्गाचा कायापालट करून त्याला 'मॉल रोड'च्या धर्तीवर आकर्षक आणि सुसज्ज स्वरूप देण्याचा मानस नगरपरिषदेचे गटनेते तथा नगरसेवक शिवाजी शिंदे यांनी व्यक्त केला आहे. सध्या या रस्त्यावरील काही भाग विद्रुप अवस्थेत असल्याने पर्यटकांच्या अनुभवावर परिणाम होत आहे. त्यामुळे हा मार्ग सुशोभित करून पर्यटकांना वेगळा आणि सुखद अनुभव देण्यावर भर दिला जाणार आहे.

या उपक्रमांतर्गत रस्त्यालगतच्या मोकळ्या जागांमध्ये वृक्षारोपण करून त्यांचे नियमित संवर्धन केले जाणार आहे. तसेच, नगरपरिषदेच्या जागेवर झालेले अतिक्रमण हटवून त्या ठिकाणी पर्यटकांसाठी आकर्षक बसण्याची सोय उभारण्यात येणार आहे. यामुळे पर्यटकांना विश्रांतीसाठी सोयीस्कर सुविधा उपलब्ध होणार आहेत.

पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने 'प्लास्टिक मुक्त माथेरान' ही संकल्पना अधिक प्रभावीपणे राबवण्यावरही भर देण्यात येत आहे. विशेषतः पावसाळ्यात विक्री होणारे हलक्या दर्जाचे प्लास्टिक रेनकोट पर्यटकांकडून वापरानंतर टाकून दिले जात असल्याने पर्यावरणाला धोका निर्माण होत आहे. यावर उपाय म्हणून प्लास्टिक बंदीचा निर्णय कठोरपणे अंमलात आणण्याची भूमिका घेतली आहे. या निर्णयामुळे काही व्यापाऱ्यांना फटका बसणार असला, तरी पर्यावरणाच्या दृष्टीने हा निर्णय आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

पर्यटन वाढीसाठी आवश्यक त्या मूलभूत सुविधा पुरवणे ही नगरपरिषदेची जबाबदारी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आगामी काळात गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सत्ताधारी गटाने ठोस आणि लोकहिताचे निर्णय घेणे गरजेचे असल्याचे स्थानिक नागरिकांचे मत आहे. विकास, पर्यटन आणि स्थानिक रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठी सकारात्मक पावले उचलली गेल्यास माथेरानला नवचैतन्य प्राप्त होईल, अन्यथा इतर पर्यटनस्थळांच्या तुलनेत मागे पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# मुंबईकरांचे दरवाजात लटकून प्रवासाचे दिवस लवकरच संपणार

## बंद दरवाजाची पहिली सुरक्षित लोकल मुंबईत दाखल



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१४, मुंबई :** देशातील पहिली, स्वयंचलित दरवाजे असलेली नॉन-एसी लोकल ट्रेन मुंबईत दाखल झाली आहे. शहराची 'जीवनवाहिनी' म्हणून ओळखली जाणारी 'मुंबई लोकल' अधिक सुरक्षित आणि सोयीस्कर करण्याच्या उद्देशाने, बंद दरवाजे असलेली एक नवीन लोकल ट्रेन सेवेत आणली जात आहे. मुंबई लोकल सेवेच्या इतिहासात या घटनेमुळे एका नव्या युगाची सुरुवात झाली आहे.

प्रवाशांच्या आरामास आणि सुरक्षेला प्राधान्य

सोमवारी, बंद दरवाजे असलेली पहिली नॉन-एसी लोकल ट्रेन मध्य रेल्वेच्या कुर्ला कारशेडमध्ये आणण्यात आली. ही अगदी नवीन लोकल ट्रेन मुंबईकरांचा आराम आणि सुरक्षा लक्षात घेऊनच तयार करण्यात आली आहे. १२ डबे (कोचेस) असलेली ही ट्रेन, नॉन-एसी श्रेणीतील अशा प्रकारची पहिलीच ट्रेन आहे. स्वयंचलित सरकते दरवाजे असलेली ही ट्रेन, मुंबईच्या अत्यंत गर्दीने भरलेल्या उपनगरीय मार्गांवर प्रवाशांची सुरक्षा वाढवण्याच्या विशिष्ट उद्देशाने बांधण्यात आली आहे.

मध्य रेल्वेला प्राप्त झालेल्या, बंद दरवाजे असलेल्या या पहिल्या नॉन-एसी लोकल ट्रेनची रचना (डिझाइन) अगदी एसी रॅकसारखीच आहे. चेन्नई येथील पेरांबूर येथील 'इंटीग्रल कोच फॅक्टरी'मध्ये निर्मित ही लोकल ट्रेन, नेहमीच्या लोकल गाड्यांपेक्षा अनेक महत्त्वाच्या बाबींमध्ये वेगळी ठरते. मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील नीला यांनी सांगितले की, वरकरणी साधी वाटणारी, तरीही अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेली आणि स्वयंचलित दरवाजे असलेली ही लोकल ट्रेन, प्रवाशांसाठी सुधारित सुविधा उपलब्ध करून देते; ज्यामध्ये सुधारित वायुवीजनाचाही समावेश आहे. ही ट्रेन अत्यंत प्रगत अशा 'अग्नि-शोधक प्रणाली'ने (सुसज्ज आहे.

शिवाय, नेहमीच्या ९०० मिमी आकाराच्या खिडक्यांऐवजी, या लोकलमध्ये १९०० मिमी आकाराच्या मोठ्या खिडक्या आहेत, ज्यामुळे हवेचा संचार अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकतो. याव्यतिरिक्त, संपूर्ण ट्रेनमध्ये दर तासाला १०,००० घनमीटर ताजी हवा खेळती ठेवण्यासाठी एक विशेष प्रणाली बसवण्यात आली आहे. स्वयंचलित दरवाजे असलेल्या या नॉन-एसी लोकलचे डबे आणि आसनव्यवस्था अगदी एसी लोकल गाड्यांसारखीच दिसावी, अशा प्रकारे तयार करण्यात आली आहे. या ट्रेनमध्ये प्रवाशांना उभे राहण्यासाठीही अधिक जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मुंबईच्या नेहमीच्या लोकल गाड्यांमध्ये गर्दीच्या वेळी होणाऱ्या प्रचंड गर्दीमुळे घडणारे अपघात रोखण्याच्या विशिष्ट उद्देशानेच, बंद दरवाजे असलेल्या या नवीन लोकल गाड्यांची निर्मिती करण्याचे निर्देश रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिले होते. प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पाहता, मुंबईत धावणाऱ्या सर्वच लोकल गाड्यांना बंद दरवाजे असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हे नमूद करणे महत्त्वाचे आहे की, जून २०२५ मध्ये कळवा मुंब्रा दरम्यान घडलेल्या एका घटनेनंतर ज्यामध्ये गर्दीने खचाखच भरलेल्या लोकल ट्रेनच्या उघड्या दरवाजांतून अनेक प्रवासी खाली पडले होते रेल्वेमंत्र्यांनी अशी घोषणा केली होती की, भविष्यात मुंबईसाठी तयार केल्या जाणाऱ्या सर्व लोकल गाड्यांना 'बंद दरवाजे' असतील. त्या निर्देशानुसार, आता ही पहिली 'बिगर-वातानुकूलित' लोकल ट्रेन सेवेत दाखल करण्यात आली आहे. सामान्य प्रवाशांची सुरक्षा सुनिश्चित करण्याच्या दिशेने उचललेले हे एक 'ऐतिहासिक पाऊल' म्हणून गौरवण्यात येत आहे.

या ट्रेनमध्ये एक प्रगत वायुवीजन प्रणाली बसवण्यात आली आहे. गुदमरण्याची समस्या टाळण्यासाठी, ब्लोअर्सनी सुसज्ज असलेल्या या नवीन बिगर-वातानुकूलित लोकलमध्ये '६+३+३' अशी डब्यांची रचना असेल. या रचनेमध्ये 'प्रथम श्रेणी'साठी ४ डबे, 'प्रथम श्रेणी महिलां'साठी राखीव २ डबे, 'द्वितीय श्रेणी महिलां'साठी ५ डबे आणि ८ 'सामान्य' डबे यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, सामानासाठी आणि दिव्यांग प्रवाशांसाठी प्रत्येकी दोन स्वतंत्र डबे निश्चित करण्यात आले आहेत.

दरम्यान या ट्रेनच्या रचनेचा आराखडा तयार करताना समोर आलेले सर्वात मोठे आव्हान म्हणजे 'वायुवीजन' होय. बिगर-वातानुकूलित गाड्यांचे दरवाजे बंद ठेवल्यास डब्यांमध्ये हवेचा संचार खुंटेल, अशी भीती व्यक्त केली जात होती. ही समस्या सोडवण्यासाठी, संपूर्ण ट्रेनमध्ये शक्तिशाली वायुवीजन युनिट्स बसवण्यात आले आहेत. छतावर बसवण्यात आलेले 'ब्लोअर्स' डब्यांमध्ये सतत ताजी हवा खेळती ठेवतात. गर्दीच्या वेळी होणारी प्रचंड गर्दी लक्षात घेऊन, या ट्रेनमध्ये चालकाच्या केबिनशी जोडलेली 'स्वयंचलित दरवाजा-बंद प्रणाली' बसवण्यात आली आहे; तसेच सेन्सर्स, 'टॉक-बॅक' प्रणाली, प्रवासी माहिती फलक आणि सुधारित वायुवीजन सुविधाही यात समाविष्ट आहेत. यामुळे डब्यांच्या आत कार्बन डायऑक्साइड वायू साचून राहत नाही याची खात्री केली जाते. सामानाची रॅक आणि आसनव्यवस्था यांपासून ते आपत्कालीन अलार्मपर्यंत या बिगर-वातानुकूलित ट्रेनमधील सर्व सुविधा हुबेहूब वातानुकूलित लोकल गाड्यांमधील सुविधांसारख्याच आहेत.

मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील नीला यांनी सांगितले की, स्वयंचलित दरवाजे असलेल्या या बिगर-वातानुकूलित लोकल ट्रेनला प्रवासी सेवेत दाखल करण्यापूर्वी तिची 'चाचणी' घेतली जाईल. चाचण्यांसह सुरक्षेशी संबंधित सर्व औपचारिकता यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतरच, ही ट्रेन प्रवाशांच्या सेवेसाठी रुळांवर धावेल.

## आंबेडकर जयंतीनिमित्त सोलापूरमध्ये 'विश्वरत्न औषधीवन' ची भव्य सुरुवात



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.१४, सोलापूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती दिनानिमित्त सोलापूर शहरात पर्यावरण संवर्धनाचा नवा आदर्श निर्माण करत विश्वरत्न औषधीवन या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वस्तीगृह तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले वस्तीगृह समोरील परिसरात बॉटनिकल गार्डन उभारणीचा शुभारंभ करण्यात आला असून या उपक्रमाला विश्वरत्न वन असे नामकरण करण्यात आले आहे.

यावेळी बोधीवृक्ष (पिंपळ) रोप लावून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. तसेच विविध देशी व औषधी वनस्पतींची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

या उपक्रमासाठी इको नेचर क्लब यांच्या पुढाकारातून सोलापूर महानगरपालिका सामाजिक न्याय विभाग, जिल्हा विधी प्राधिकरण, सामाजिक वनीकरण, माझी वसुंधरा अभियान, वन विभाग, पोलीस प्रशासन तसेच पर्यावरणप्रेमी व वृक्षप्रेमी यांच्या समन्वयातून वृक्ष संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक होत आहे. पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी व विविध औषधी व देशी वनस्पतींची लागवड करण्यासाठी शासनाच्या वनधोरणानुसार वस्तीगृहातील विद्यार्थ्यांच्या सहभागातून इको क्लबची स्थापना देखील करण्यात आली.

सोलापूरच्या नूतन पर्यावरण रक्षक युवा उपमहापौर ज्ञानेश्वरी महेश देवकर यांच्या शुभहस्ते या बॉटनिकल गार्डन निर्मितीची सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमास नगरसेवक सत्यजित वाघमोडे, विशेष कार्यकारी अधिकारी महेश देवकर, पर्यावरण दूत मनोज देवकर, वस्तीगृह अध्यक्षा मनीषा जगताप, तसेच राम हुंडारे, सिद्धार्थ भडकुंबे, मोहन कांबळे आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जयंतीनिमित्त १३५ रोपांची लागवड करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पर्यावरणाच्या माध्यमातून अभिवादन करण्यात आले.

पुढील काळात या परिसरात ग्रीन पट्टा, बॉटनिकल गार्डन, वाचन कट्टा, सायकल ट्रॅक अशा विविध पर्यावरणपूरक सुविधा विकसित करण्यात येणार असून या उपक्रमाचा लाभ विद्यार्थ्यांसह नागरिकांना होणार आहे.

हा उपक्रम म्हणजे केवळ वृक्षारोपण नव्हे, तर हरित, स्वच्छ आणि शाश्वत सोलापूरसाठी उचललेले एक प्रेरणादायी पाऊल असून पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक मजबूत करणारा आदर्श ठरणार आहे.

## चंद्रपूर जिल्हा प्रशासनाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक वुईके यांनी चंद्रपूर शहरातील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला हारार्पण करून अभिवादन केले. यावेळी माजी खासदार हंसराज अहीर, आ. सुधिर मुनगंटीवार, आ. किशोर जोरगेवार, महापौर संगिता खांडेकर, जिल्हाधिकारी वसुमना पंत, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, मनपा आयुक्त अकुनुरी नरेश, उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, सहायक आयुक्त समाजकल्याण विनोद मोहतुरे आदी उपस्थित होते. याप्रसंगी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने काढण्यात आलेल्या प्रभातफेरीला पालकमंत्री डॉ. वुईके यांनी हिरवी झेंडी दाखवून रवाना केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर जयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलतांना पालकमंत्री डॉ. वुईके म्हणाले, आजचा दिवस केवळ जयंती उत्सव नाही तर डॉ. आंबेडकरांचा संघर्ष तसेच त्यांच्या विचारांचे आणि कार्याचे स्मरण करण्याचा दिवस आहे. संपूर्ण जगात डॉ. बाबासाहेबांची जयंती साजरी केली जाते. भारतीय संविधानामुळेच सर्व नागरिकांना समान हक्क, न्याय, समता, बंधुता यांच्यासोबतच मुलभुत अधिकार आणि कर्तव्ये मिळाली आहेत. त्यांनी दिलेल्या आरक्षणामुळे आज मी येथे आपल्यासमोर उभा आहे. राज्य शासनाने आरक्षण वर्गीकरणाचा विषय जनतेच्या चर्चेसाठी ठेवला असून त्याला मुदतवाढ देण्यात आली आहे. यावर नक्कीच सकारात्मक निर्णय शासन घेईल, असेही त्यांनी सांगितले. आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, जयंती केवळ एक दिवस नाही तर ३६५ दिवस योग्य कृती करणे, हे डॉ. आंबेडकर यांना खरे अभिवादन राहील. त्यांच्या विचारांचे प्रत्येकाने स्मरण करावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लंडन येथील वास्तुला स्मारक बनविण्याचे सौभाग्य मला मिळाले. चंद्रपूर हा डॉ. आंबेडकरांच्या विचारावर उत्तम काम करणारा जिल्हा असावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आ. किशोर जोरगेवार म्हणाले, १४० कोटीच्या जनतेला संविधानाने एकसंघ ठेवले आहे. आज मानवतेचा संकल्प करण्याचा दिवस आहे. येथील दीक्षाभूमीच्या विकासासाठी १०० कोटींचा प्रस्ताव पाठविण्यात आला असून यापैकी ५७ कोटी मंजूर झाले आहे. उर्वरीत निधी तात्काळ मंजूर करावा, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी महापौर संगिता खांडेकर, जिल्हाधिकारी वसुमना पंत, माजी मंत्री हंसराज अहीर, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, मनपा आयुक्त अकुनुरी नरेश यांनी सुध्दा मनोगत व्यक्त केले.

# शेतकऱ्यांच्या हितासाठी पालकमंत्र्यासह प्रशासनाने जागे व्हा : विक्रमबाबा पाटणकर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१४, पाटण (सातारा) :** यावर्षी राज्यात दुष्काळ जण्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असताना अशा परिस्थितीत जिल्ह्यात श्रेयवाद अस्तित्वाची लढाई त्यासाठी नितीमत्त्यांची पायमल्ली होत असताना दिसत आहे. परंतु शेतकऱ्यांच्या बाबतीत नियोजन व त्यांचे भविष्य उध्वस्त होणार नाही याबाबत कोणतेही नियोजन दिसत नाही.

शासन आणि प्रशासनाने भविष्यात येणाऱ्या संकटांना सामोरे जाण्यासाठी शेतकऱ्यांच्या पाठीमागे खंबीर पणाने उभे राहण्यासाठी काही उपाययोजना करुन दुष्काळी संकटांवर मात करण्यासाठी जिल्ह्याच्या पालक मंत्र्यासहीत लोकप्रतिनिधी व प्रशासन वेळेत जागे व्हावे. अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस अ.प. गट सत्तेमध्ये असताना देखील रस्त्यावर उतरायला मागेपुढे पाहणार नाही. असा इशारा राष्ट्रवादीचे नेते विक्रमबाबा पाटणकर यांनी पत्रकार परिषदेत दिला.

यावेळी पाटण तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) गटाचे पदाधिकारी उपस्थित होते. ते पुढे म्हणाले पाटण तालुक्यातील आपुरी असणारी धरणांची कामे तातडीने पूर्णत्वाच्या दिशेने कार्यरत होणे आवश्यक आहे. जे तलाव गाळाने भरलेले आहे. या तलावावरती गाळ काढण्याचे काम चालू झाले पाहिजे. शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात शेत तळी, विहिरी मंजूर करून पाण्याचे स्टोरेज जास्तीत जास्त कशाप्रकारे करता येईल याकडे लक्ष देणं आवश्यक आहे. तालुक्यातील लोकांचे फार मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत असून शेती वन्य प्राण्यांच्या त्रासामुळे शेती होतं नाही. आज सातारा जिल्ह्यात लोकांचे




पेरणीपूर्वी पिक कर्जे बीबीयाणे व खते या संदर्भात निश्चित स्वरूपाचे नियोजन होणे आवश्यक आहे. जिल्ह्यात युरीया सुफला सारखी खत टंचाई होणार आहे. अशा वेळी शेतकऱ्यांना किती युरीया देणार त्यात जिल्ह्याचे एकूण स्टोरेज किती याचे नियोजन असेल तर तशा पध्दतीने परमीट पेरणीपूर्वी शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक आहे.

तसेच वन्यजीव व वन्यप्राणी यांच्यापासून शेतीचे स्वरंक्षण कसे करणार याबाबत ठोस उपाययोजना शासनाकडे आहे का. नसेल तर ती कशी करणार याबाबत खुलासा होणे अपेक्षित आहे. स्वतः च्या मोठेपणाचे राजकारण आता थांबवा शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने विचार करा अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस अ.प. गट सत्तेमध्ये असताना देखील रस्त्यावर उतरायला मागेपुढे पाहणार नाही.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात आंबेडकर जयंती साजरी

**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.१४, दापोली (रत्नागिरी) :** मंडणगड तालुका विकास मंडळ संचलित, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मंडणगड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय आबासाहेब हुलगे यांच्या अध्यक्षतेखाली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस दीपप्रज्वलन व पुष्पहार अर्पण करून उत्साहात साजरी करण्यात आली. शाळेच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेचे पर्यवेक्षक शांताराम बैकर, शिक्षक प्रतिनिधी, शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी,पालकवर्ग

उपस्थित होते. शाळेचे सहा. जेष्ठ शिक्षक प्रमोद जाधव यांनी सर्वांचे



पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तसेच त्यांनी धम्म प्रार्थनाही सुद्धा म्हणून दाखविली, जयंतीचे औचित्य साधून विद्यालयातील १५विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विद्यालयामध्ये वक्तृत्व स्पर्धा निबंध स्पर्धा रांगोळी स्पर्धा चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. शाळेचे प्रा.प्रभाकर भालके यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक व राजकीय कार्य याविषयी सविस्तर माहिती सांगितली. तसेचप्रमोद जाधव यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन कार्य व संविधानाचे महत्त्व याविषयी सखोल माहिती सांगितली.

विद्यालयाचे उपमुख्याध्यापक अर्जुन हुल्लोळी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मुळगाव व त्यांच्या गावातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल मंडणगड येथे सेवा व त्यांच्या कार्याचा गौरव करण्याची संधी आपणा सर्वांना मिळाली, हे आपले भाग्य तसेच त्यांचे विचार आपण सर्वांनी स्वीकारले व प्रसार केला पाहिजे असे सांगितले कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रशाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हुलगे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची तत्त्वे ही सर्वांनी प्रत्यक्षात अंगीकारली पाहिजे व कृतीतून उतरवली पाहिजे. तसेच बाबासाहेब केवळ एकाच कोणत्याही धर्माचे नसून सर्व जनतेचे होते तसेच त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा समाजामध्ये प्रचार व प्रसार केला पाहिजे असे सांगितले. शेवटी सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योती राणे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# कोकणातील गृहउद्योजीका जान्हवी राऊत यांची गृहउद्योग क्षेत्रात उत्तुंग भरारी

जान्हवी फूड प्रॉडक्ट्स गृहउद्योग सध्या नावारूपाला येत आहे ते जाणकार खवय्यांमुळेच. दापोली तालुक्यातील, केळशी सारख्या छोट्या गावातून जेवणाच्या लहान मोठ्या ऑर्डर्स घेत असताना, त्या. विविध पदार्थ बनवून देऊ लागले. पण हे सर्व कोणत्याही मोबदल्याशिवाय करत होते. त्यांना लहानपणापासूनच विविध पदार्थ तयार करण्याची आवड होती.

त्यांचे लग्न झाल्यानंतर त्यांचे पती, भरत राऊत हे सतत बोलत होते की तू सुगरण आहेस तर त्याचा व्यवसायाच्या दृष्टीने विचार केला पाहिजे. त्याकरिता त्यांनी त्यांना मुंबई विद्यापीठाची हॉटेल मॅनेजमेंट (B.sc.Hospitality) या विषयामध्ये पदवी शिक्षण घेण्याकरता प्रवृत्त केले. व सर्वतोपरी सहाय्य केले. शिक्षण झाल्यानंतर त्या. कुटुंबापासून काही वर्षे लांब मुंबईमधील नाम अंकित ताज स्कायशेफ, ऑर्किड सारख्या हॉटेलमध्ये काम केले. परंतु कुटुंबापासून लांब असल्यामुळे तेथे मन रमले नाही. त्यानंतर दापोली मुरुड येथील प्रसिद्ध लोटस रिसॉर्ट मध्ये काही वर्षे रिसेप्शनिस्ट म्हणून काम केले. हे काम करत असताना देखील विविध पदार्थ बनवून देतच होते.

त्यांच्या व्यवसायाला कलाटणी मिळाली ती कोरोनामुळे! नोकरी सोडली,आणि २०२२ नंतर विविध प्रकारचे लाडू, चकली असे पदार्थ यांची लहान प्रमाणात विक्री करू लागले. व्यवसाय वाढवण्यासाठी पती तसेच भावोजी श्री. सतीश निंबाळकर व कौटुंबिक मित्र श्री संजय गावणकर व स्मिता गावणकर यांनी खूप प्रोत्साहन दिले. त्यांच्यामुळे आज जान्हवी फूड्स



प्रॉडक्ट्स नावारूपाला येण्यास मदतच झाली.

दापोलीतील अनेक शिक्षक, राजकीय व्यक्ती, पोलीस, व्यावसायिक इतर खात्यातील व्यक्ती आणि मित्र, मैत्रिणी यांच्यामुळे पदार्थांची जाहिरात आपोआप झाली. सुरवातीला दापोलीम ध्ये विक्री करत होते. आज पुर्ण जिल्ह्यात तसेच मुंबई, पुणे येथे जान्हवी फूड्सच्या खाद्यपदार्थांना मागणी आहे. आणखी नमूद करण्यास आनंद वाटतो की, अमेरिका, इंग्लंड, दुबई सारख्या देशातही कोकणातील यांच्या पदार्थांची चव चाखली गेली व चव त्यांच्या पसंतीला उतरली.

लाडू, चकली पासून सुरुवात करता करता आज विविध पदार्थ, शाकाहारी व मांसाहारी जेवण, नाश्त्याचे पदार्थ बनवून विक्री करू लागले. जान्हवी राऊत स्वतः सांगतात, कि यशामध्ये अनेक लोकांचा वाटा आहे त्यांचे कृतज्ञता व्यक्त करते.

**मी बनवत असलेले पदार्थ –**

जान्हवी फुडस् प्रॉडक्ट्स, जालगाव, दापोली. येथे येऊन खरेदी करावे. आपले, आम्ही स्वागत करु इच्छितो.

# अग्निशमन सेवा दिनानिमित्त नमुंमपा शहीद अग्निशमन जवानांना आदरांजली

**अक्षराज : जे. के पोळ**

**दि.१४, नवी मुंबई :** आपल्या जीवाची पर्वा न करता इतरांचे जीव वाचविण्यासाठी अग्निशमनाचे कार्य करणाऱ्या जवानांच्या कार्यतत्परतेला व सेवाभावाला सलाम करीत आपले कर्तव्य बजावताना प्राणांचे बलिदान करणाऱ्या अग्निशमन जवानांना नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी आदरांजली अर्पण केली.

नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन दलाच्या वतीने वाशी अग्निशमन केंद्रात अग्निशमन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी महापौर सुजाता पाटील यांनी शहीद अग्निशमन जवानांच्या स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून भावपूर्ण आदरांजली अर्पण केली आणि उपस्थित अग्निशमन जवानांशी संवाद साधला. याप्रसंगी आयुक्त डॉ,कैलास शिंदे, नगरसेविका अंजली



वाळुंज, मुख्य अग्निशमन अधिकारी तथा शहर अभियंता शिरीष आरदवाड, उपमुख्य अग्निशमन अधिकारी पुरूषोत्तम जाधव, विभागीय अग्निशमन अधिकारी गजेंद्र सुसविरकर यांनीही पुष्पचक्र अर्पण करून श्रध्दांजली अर्पण केली.

अग्निशमनाचे कार्य तत्परतेने करीत असतानाच आग लागू नये याकरिता घ्यावयाच्या खबरदारीबाबत किंवा आग लागल्यानंतर अग्निशमन दल येईपर्यंत तातडीने करावयाच्या बजाव कार्याबाबत नागरिकांकरिता माहिती व मार्गदर्शक उपक्रम राबविताना गावठाण भागातील नागरिकांमध्येही व्यापक प्रमाणात जनजागृती करण्याकडे विशेष लक्ष द्यावे असे यावेळी महापौर महोदयांनी सूचित केले.

याप्रसंगी बोलताना आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी अग्निविमचनाचे काम करताना शहीद झालेल्या जवानांना आदरांजली अर्पण करीत अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठीची खबरदारी घेण्याचा संदेश अंगिकारण्यासाठी अग्निशमन सेवा दिन महत्वाचा असल्याचे सांगितले. नवी मुंबईत आता बहुमजली उंच इमारती उभ्या रहात असून यापुढील काळात आपल्या पुढील आव्हाने मोठी असल्याचे सांगत फायर ऑडिट नियमित करणे, त्याची तपासणी करणे, नियमितपणे मॉक ड्रील घेणे, नागरिकांमध्ये जागरूकता आणणे, विशेषत्वाने सोसायट्यांमध्ये वा रस्त्यावर अग्निशमनाचे वाहन जाण्यास अडथळा होईल अशाप्रकारे रहिवाश्यांनी वाहने पार्कींग करण्याचे टाळणे या गोष्टींकडे प्राधान्याने लक्ष देण्याच्या सूचना आयुक्तांनी केल्या.

## थोडक्यात

### चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते सीएसआर– वन प्रमाणपत्र प्रदान



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, पुणे :** दिनांक १३ रोजी पुणे येथे चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते संस्थेला सीएसआर वन प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. सीएसआर - वन प्रमाणपत्र प्रदान करताना चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांनी अत्यंत समाधान व्यक्त केले व ग्रामीण पातळीवरती सीएसआर वन प्रमाणपत्र मिळवणारी कदाचित पश्चिम महाराष्ट्रातली ही पहिलीच संस्था असावी असे त्यांनी मत व्यक्त केले. सीएसआर वन प्रमाणपत्र मिळवणे म्हणजे अत्यंत चांगल्या प्रकारे सामाजिक कार्य करणे व आपल्या कामामध्ये उच्चतम कोटीची पारदर्शकता ठेवणे, असे यातून ध्वनीत होत असते. आपण गतवर्षी संस्थेचे ८०-जी प्रमाणपत्र प्राप्त केलेले होते यावर्षी आपण सी एस आर - वन प्रमाणपत्र प्राप्त करून आपल्या संस्थेची एक प्रकारे प्रगती नोंद करत आहात. मला याबाबत अत्यंत समाधान असून मी आपणाला आपल्या कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करतो आणि माझ्याकडून पूर्ण सहकार्य व्यक्त करतो अशा त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी संस्थेचे अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष राम पडघे, सचिव नामदेवराव झगडे, जिल्हा समन्वयक माननीय पोपटराव भोज, महिला अध्यक्ष सुरेखा हाडके, संचालक व ज्येष्ठ मार्गदर्शक अरूण किरवे, याशिवाय श्री. चिलेकर, सुनील काळे, श्री.वाठारकर व अनेक समाज बांधव यावेळी उपस्थित होते.

### ‘आपले पालम’ व्हाट्सअप ग्रुपतर्फे बसस्थानक परिसरात पाणपोईचा शुभारंभ



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१४, पालम परभणी) :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून, सामाजिक कार्यात नेहमीच सक्रिय असणाऱ्या 'आपले पालम' या व्हॉट्सॲप ग्रुपच्या वतीने एक स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला आहे. वाढत्या उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन, प्रवाशांची तहान भागवण्यासाठी बसस्थानक परिसरात उभारण्यात आलेल्या पाणपोईचे उद्घाटन नगरसेवक लक्ष्मणराव रोकडे, नगराध्यक्ष प्रतिनिधी इमदाद खान पठाण व डॉ. महेश कोकाटे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी 'आपले पालम' ग्रुपचे ॲडमिन विलास चव्हाण, भैय्या सिरस्कर, मारोती नाईकवाडे, गुणवंत सराफ, रामप्रसाद कदम, भगवान सिरस्कर, गजानन देशमुख, राहुल गायकवाड, बाबाराव आवरगंड, राहुल हत्तीआंबीरे यांच्या सह सर्व सन्माननीय सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बसस्थानक हा प्रवाशांची मोठी वर्दळ असलेला परिसर आहे. कडक उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची गैरसोय होऊ नये, या भावनेतून 'आपले पालम' या व्हाट्सअप ग्रुपने पाणपोईची व्यवस्था केली आहे. या उपक्रमाबद्दल उद्घाटनप्रसंगी मान्यवरांनी ग्रुपच्या सदस्यांचे कौतुक केले. केवळ सोशल मीडियापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष जमिनीवर उतरून सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी हा ग्रुप नेहमीच अग्रेसर असतो, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

या उपक्रमामुळे बसस्थानकावर येणाऱ्या प्रवाशांना व नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, सर्वस्तरातून ‘आपले पालम’ व्हाट्सअप ग्रुपचे अभिनंदन होत आहे.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना नवी मुंबई मनपाच्या वतीने विनम्र अभिवादन




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१४, नवी मुंबई :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, आयुक्त डॉ. कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, प्रशासन विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, सहा.संचालक नगररचना सोमनाथ केकाण, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे, कार्यकारी अभियंता प्रवीण गाडे व राजेश पवार आणि तसेच इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### जुईनगरमध्ये ‘भीम महोत्सव २०२६’ चे आयोजन

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.१४, जुईनगर (नवी मुंबई) :** बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. ८२८ व संघमित्रा महिला मंडळ, जुईनगर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक १९ एप्रिल २०२६ रोजी ‘भीम महोत्सव २०२६’ चे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सेक्टर २३, जुईनगर येथील म्युनिसिपल शाळेच्या पटांगणात, वीणा हॉटेल समोर पार पडणार आहे.

या महोत्सवाच्या निमित्ताने प्रबोधनपर कार्यक्रम, धम्म पद, वाद्यवृंद तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यासोबतच विभागातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजसेवकांचा उचित सन्मान देखील करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून खासदार नरेश म्हस्के तसेच सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांची उपस्थिती लाभणार आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुनील शिर्के, सूर्यकांत सावंत, यशवंत शिंदे, समीर साळवी, मिलिंद पवार व शिवदास सकपाळ हे कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. अशी माहिती संस्थेचे सचिव सिद्धार्थ साळवी यांनी दिली.